नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३४० Issue - 340 | वार रविवार दि. ३ मे २०२६ Blow- Sunday Date 3 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# गाढ झोपेत असलेल्या आईसह दोन लेकरांना संपवले

## संपत्तीच्या वादातून तिघांना संपवले ; बोरामणी गावात प्रचंड संताप आणि हळहळ, कारवाईची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहरापासून अगदी जवळच असलेल्या बोरामणी गावात तिघांना संपवण्यात आलं आहे. या घटनेनं संपूर्ण जिल्हा हादरला आहे. संपत्तीच्या वादातून दिरानेच मृत भावाच्या संसाराचा घात करत घालत वहिनी, पुतणी आणि पुतण्याचा जीव घेतल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. वहिनी गायत्री सुधाकर मस्के (वय ४२), मुलगी प्रिया सुधाकर मस्के (वय १८) आणि मुलगा शिवराज सुधाकर मस्के (वय १६ वर्षे) अशी मृतांची नावे आहेत. पप्पू म्हस्के असं संशयित आरोपीचं नाव आहे. तालुका पोलिसांनी माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आहे. तिन्ही पार्थिव पोस्टमार्टेमसाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. शेतीच्या वादातून ही घटना झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

पतीच्या निधनानंतर दोन लेकरांसोबत राहत होती

गायत्री म्हस्के या पतीच्या निधनानंतर अत्यंत हलाखीच्या परिस्थित आयुष्य जगत होत्या. पती सुधाकर म्हस्के यांच्या निधनानंतर गायत्री म्हस्के आपल्या दोन लेकरांना घेऊन संघर्षमय जीवन जगत होत्या. मात्र, म्हस्के कुटुंबावर मध्यरात्री मोठं संकट कोसळलं आणि गायत्री म्हस्के आणि त्यांच्या दोन्ही लेकरांना संपत्तीच्या वादातून संपवण्यात आलं आहे.

चुलता आला आणि तिघांवर जीवघेणा हल्ला

संशयित आरोपी पप्पू म्हस्के हा मध्यरात्री स्वतःच्या घरातून हातात धारदार शस्त्र घेऊन टेरेसवर गेला. संबंधित कुटुंबातील घरांना एकाच गच्चीवर जाण्याचा मार्ग सामायिक असल्याची माहिती समोर आली आहे. त्यावेळी मयत तिघे गच्चीवर झोपले होते. याचवेळी संपत्तीच्या वादातून जोरदार हाणामारी सुरू झाली आणि हातातील धारदार शस्त्राने संशयिताने प्रथम वहिणी गायत्री मस्के



यांच्यावर हल्ला केल्याचं समोर येत आहे. आईवर होत असलेला जीवघेणा हल्ला पाहून मुलगी प्रिया आणि मुलगा शिवराज हे आईला वाचवण्यासाठी मध्ये पडले. मात्र, क्रूरतेचा कळस गाठत संशयिताने आई आणि मुलीवर हल्ला करत त्यांनाही संपवले. दरम्यान, गंभीर जखमी अवस्थेत असलेला मुलगा शिवराज जीव वाचवण्यासाठी टेरेसवरुन खाली आपल्या घराकडे पळत आला. पण आरोपीने त्याचाही पाठलाग करत त्याला गाठले आणि त्याच्यावरही जीवघेणा वार करून त्याला संपवलं असल्याची माहिती समोर आली आहे.

दोन पार्थिव टेरेसवर, मुलगा खाली मृतावस्थेत

घटनेनंतर टेरेसवर आई आणि मुलगी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आल्या, तर मुलगा घराच्या खालील भागात मृता-वस्थेत सापडला. घटनास्थळी रक्ताने माखलेली तलवारही पोलिसांना आढळून आल्याची माहिती मिळाली आहे. या भीषण घटनेची माहिती मिळताच तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ अधिकारी, गुन्हे शाखेचे पथक तसेच फॉरेन्सिक टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाले. संपूर्ण परिसर पोलीस बंदोबस्तात घेण्यात आला असून पुरावे संकलन आणि पंचनामा सुरू आहे. आधी पतीचा आधार हरपलेले हे कुटुंब जगण्यासाठी संघर्ष करत होते. आई लेकरांना घेऊन संसाराचा गाडा हाकत होती. पण संपत्तीच्या वाद-ाने एवढे विकृत रूप धारण केलं की, त्याच कुटुंबातील तिघांचं रक्त एकाच रात्री सांडलं. आईला वाचवण्यासाठी धावलेल्या लेकरांचीही निर्दयीपणे हत्या करण्यात आल्यानं बोरामणी परिसरात प्रचंड संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे.

## पुणे नसरापूर प्रकरण; सीसीटीव्हीत चिमुकली शेवटची दिसली, बॉडी शेणात लपवली; आरोपीची संतापजनक कबुली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : भोर तालुक्यातील नसरापूरमध्ये काल शुक्रवारी एक संतापजनक घटना घडली. चार वर्षांच्या चिमुकलीच्या हत्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. तरुणी, महिला आणि आता लहान चिमुकल्याही सुरक्षित नसल्याने सर्वत्र संताप पसरला आहे. चार वर्षांच्या चिमुकलीच्या हत्येनं सर्वत्र शोककळा पसरली असून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी स्थानिकांकडून मागणी होत आहे. या प्रकरणाने संपूर्ण राजकारण समाजकारणही तापलं असून आरोपीला शिक्षा देण्यासाठी मागण्या करत आ-हेत.

काल शुक्रवारी ज्यावेळी भर दुपारी ही चिमुकली गायब झाली, त्यावेळी सर्वांनी तप-ासाला सुरुवात केली. सर्वत्र तपास करुनही मुलगी न सापडल्यानं स्थानिकांनी सीसीटीव्ही फुटेज तपासायला सुरुवात केली. सीसीटीव्हीमध्ये मात्र संशयास्पद दृश्य आढळले आणि बघणाऱ्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. सीसीटीव्हीमध्ये ही चिमुकली एका ६५ वर्षीय माणसासोबत गोठ्यात जाताना दिसत आहे. मात्र, ती पुन्हा बाहेर आलेली दिसलीच नाही. सीसीटीव्ही बघितल्यानंतर नागरिकांनी तातडीने तिच्यासोबत आत गेलेल्या आरोपीला शोधायला सुरुवात केली. घटनास्थळापासून ते गावच्या बाहेरपर्यंत नागरिकांनी पायाला भिंगरी लावत शोध घ्यायला सुरुवात केली. अखेर काही वेळाने हा आरोपी नागरिकांना सापडला. परंतु विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मात्र तो देत नव्हता. स्थानिकांनी मात्र कठोर भूमिका घेत आरोपीला चोप द्यायला सुरुवात केली आणि अखेर त्या नराधमाने त्यानं केलेलं विकृत कृत्य सांगायला सुरुवात केली. त्यातून मोठे खुलासे बाहेर यायला लाग-ले. या कबुलीमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. गावात संतापाची लाट उसळ-ली. आरोपीने चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याचं कबूल केलं आणि त्यानंतर पार्थिव कुठे लपवला आहे याची माहितीही दिली.

आरोपीच्या कबुलीनंतर ग्रामस्थ आणि पोलीस घटनास्थळी पोहोचले. तिथे शेणाच्या ढिगाऱ्यात लपव-लेला पार्थिव आढळून आला. ही माहिती समजताच गावात एकच आक्रोश उसळला. संतप्त ग्रामस्थांनी आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली असून काही काळ तणा-वाचं वातावरण निर्माण झालं होतं. संध्याकाळी पार्थिव बाहेर काढल्यानंतर ग्रामस्थांचा राग अधिकच वाढला आणि त्यांनी पोलीस ठाण्याबाहेर मोठं आंदोलन केलं. काही ठिकाणी रास्तारोकोही करण्यात आला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांकडून अधिकचा तपास सुरु

पोलिसांनी सांगितलं की, आरोपीला तातडीने अटक करण्यात आली असून त्याच्यावर पोक्सोसह गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आर-ोपीचा पूर्वीही गुन्हेगारी इतिहास असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे त्याच्या प्रवृत्तीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. या प्रकरणामुळे नसरापूरसह संपूर्ण भोर तालुका हादरला असून नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी सातत्याने होत आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्याची मागणीही जोर धरत आहे.

सात मे पर्यंत पोलीस कोठडी

दरम्यान, आज या आर-ोपीला पुणे जिल्हा सत्र न्यायालयामध्ये नेण्यात आले होते. त्यानंतर त्याला सात मे पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. या प्रकरणाचा संपूर्ण तपास पोलीस करत आहेत. आरोपीने दिलेल्या कबुलीनंतर आता मागील केलेले गुन्हे देखील बाहेर येण्याची शक्यता आहे, त्याचा देखील तपास सुरू आहे. या तपासांमध्ये नेमकं काय बाहेर येतं? आरोपीला कठोरात कठोर शिक्षा दिली जातेय का? या चिमुकलीला न्याय मिळतो का? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## बारावी परीक्षेत पुणे विभागाचा ९३.३४ टक्के निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बारावी परीक्षेचा निकाल आज (२ मे) जाहीर करण्यात आला. राज्यात पुणे विभागाचा निकाल ९३. ३४ टक्के लागला असून राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. बारावी निकालात पुन्हा एकदा कोकण विभागाने बाजी मारली आहे. विद्यार्थ्यांना ७ वेगवेगळ्या वेबसाईटवर आपला निकाल पाहता येणार आहे. यावर्षी राज्याचा एकूण निकाल ९१.८७ टक्के लागला आहे. गेल्या वर्षीच्या ९३.२९ च्या तुलनेत यात १.४२ टक्क्यांची घट झाली आहे.

राज्यात पुन्हा मुलींची सरशी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मुलींनी बाजी मारली आहे. मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९४.७३ टक्के आहे, तर मुलांचे प्रमाण ८९.१४ टक्के आहे.

मुली मुलांपेक्षा ५.५९ टक्क्यांनी जास्त उत्तीर्ण झाल्या आहेत. सर्व नऊ विभागीय मंडळांमध्ये कोकण विभाग ९७.५१ टक्के निकालासह प्रथम क्रमांकावर आहे. सर्वात कमी निकाल लातूर विभागाचा लागला आहे.

**नऊ विभागीय मंडळाचा निकाल** – पुणे ९१.२५, नागपूर ८८.६७, छत्रपती संभाजीनगर ८८.६८, कोल्हापूर ८९.९७, अमरावती ९०.९२, नाशिक ९०.७२, लातूर ८४.१४, कोकण ९४.१४, मुंबई ९०.०८

शाखानिहाय निकाल – विज्ञान शाखा: ९६.४४ टक्के, वाणिज्य शाखा: ९२.७१ टक्के, कला शाखा: ८६.४५ टक्के, व्यावसायिक अभ्यासक्रम : ८७.७५ टक्के

निकालाची ठळक वैशिष्ट्ये

१. डिजिटल क्रांती: यावर्षी प्रथमच गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र निकाल लागल्यापासून १५ व्या दिवशी एकाच वेळी शाळांमध्ये उपलब्ध करून दिली जातील.

२. सुरक्षा उपाय: पेपर वाहतुकीसाठी ऋझड एनेबल डिजिटल लॉक सिस्टिमचा यशस्वी वापर करण्यात आला.

३. कॉपीमुक्त अभियान: कडक निर्बंधांमुळे यावर्षी निकालात काही प्रमाणात घट झाली आहे. परीक्षेदरम्यान १९८३ गैरप्रकार आढळले असून १०० कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

४. सवलतीचे गुण: खेळा-डू, छउउ, स्काऊट आणि गाईड विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार सवलतीचे गुण देण्यात आले आ-हेत.

५. पुरवणी परीक्षा: जे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत त्यांच्यासाठी जून-जुलै २०२६ मध्ये पुरवणी परीक्षा घेतली जाईल.

## 'होर्मुझ'वरून अमेरिका-इराण संघर्ष आणखी चिघळला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तेहरान : पश्चिम आशियातील तणाव निवळण्यासाठी इराणने अमेरिकेसमोर एक नवा शांती प्रस्ताव ठेवला होता. मात्र, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा प्रस्ताव स्पष्टपणे फेटाळून लावला आहे. इराणने दिलेला प्रस्ताव आपल्याला मान्य नसल्याचे सांगत ट्रम्प यांनी आक्रमक पवित्रा कायम ठेवला आहे. यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू अस-लेला अमेरिका-इराण संघर्ष आता अधिकच लांबणीवर पडण्याची चिन्हे आहेत.

इराणने आपल्या प्रस्तावात म्हटले होते की, व्यापार आणि जागतिक तेल पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले होर्मुझ स्ट्रेट पुन्हा जहाजांच्या वाहतुकीसाठी खुले केले जाईल. त्या बदल्यात अमेरिकेने इराणच्या बंदरांवर लादले-ली नौदलाची नाकेबंदी मागे घ्यावी. इराणच्या मते, आधी दोन्ही देशांमधील तणाव कमी व्हावा आणि त्यानंतरच अणुकार्यक्रमासारख्या जटिल विषयावर चर्चा व्हावी. डोनाल्ड ट्रम्प यांना इराणची ही रणनीती रुचलेली नाही. इराण आधी परिस्थिती सामान्य करू इच्छितो आणि अण्वस्त्रांचा मुद्दा नंतर चर्चेला घेऊ इच्छितो. मात्र, अमेरिकेची अट स्पष्ट आहे की, जोपर्यंत इराण अण्वस्त्रे बनवणार नाही याची लेखी आणि ठोस हमी मिळत नाही, तोपर्यंत अमेरिका मागे हटणार नाही. इराण अशा अटी ठेवत आहे ज्या आम्ही स्वीकारू शकत नाही, असे सांगत ट्रम्प यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून इराणने केवळ स्वतःची जहाजे सोडून खाडीतील इतर सर्व जहाजांची ये-जा रोखली आहे. याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेनेही इराणी बंदरांवर कडक निर्बंध लादले आहेत. या संघर्षामुळे जागतिक बाजारपेठेत तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला असून ऊर्जा टंचाईचे संकट गडद झाले आहे.

बोलो भारत माता की जयचा जयघोष करीत शहरात मिरवणूक

राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांचे प्रतिपादन

# संविधान व निसर्ग वाचवण्यासाठी सर्व जाती-धर्माच्या लोकांनी देशसेवा करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर दि. २

बोलो भारत माता कि जय! वंदे मातरम! चा जयघोष करीत भगवान गौतम बुद्ध , महात्मा बसवेश्वर महाराज, छत्रपती शिव-ाजी महाराज,घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांसह तिरंगा झेंडा हातात घेऊन राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराजाची उघडया जीप मधून भव्य ऐत्याहाशीक मिरवणूक काढण्यात आला.ही शिस्त बध्द मिरवणूक सोलापूर शहरात लक्षवेधी ठरला.

देशासाठी महान कार्य केलेल्या सर्व राष्ट्रीय महापुरुष हे देशाचे अमूल्य रत्न आहेत. त्यांना त्यांच्या जातीसाठी सीमीत करू नये. त्यांना भारत देशाच्या उन्नतीसाठी प्रगतीसाठी वापरावे. फक्त एका जाती धर्मासाठी वापर करू नये. एकच जाती, एकच धर्मामुळे संविधान व निसर्ग वाचवता येत नाही.

संविधान व निसर्ग वाचवण्यासाठी सर्व जाती-धर्माची लोक एकत्रित येऊन हम सब भारतीय है म्हणून देश भक्ती सेवा करणे काळाची गरज बनली आहे. या प्रमुख उद्देशाने राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज सोलापूर येथे या थोर महापुरुषांचे जयंती उत्सव मोट्या जल्लोष्यात साजरा केला आहे.

देशातील लोकांमध्ये देश भक्ती व एकता मजबूत करणेसाठी महाराष्ट्र, राजस्थान, उत्तरप्रदेश, कर्नाटक, तेलंगण, आंध्रप्रदेश सह भारतातून हजारो देशभक्त राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या नेतृत्वाखाली हजारो किलोमीटरच्या प्रवास करीत देशभक्तीपर यात्रेत सोलापूर येथे मोठया संख्येने सहभागी झाले होते.सकाळी अकराच्या सुमारास सोलापुरातील बस स्टॅन्ड जवळलील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वारुढ पुतळ्याला देशवासियांच्या वतीने राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या शुभ हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यानंतर पार्क चौकातील चार हुतात्मा पुतळा येथून देशभक्तीचा जयघोष करीत भव्य मिरवणूकिस सुरवात करण्यात आला.यानंतर चार हुतात्मा व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून डफरिन चौक मार्गे, कामत हॉटेल चौक, व्हीआयपी रोड, संगमेश्वर कॉलेज, सात रस्ता चौक येथून विविध वाद्य समवेत हजारो देशभक्तांनी देशभक्तीचा चा जयघोष करीत विक्रमी मिरवणूक काढले.

यावेळी पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता.यानंतर हेरिटेज लॉन येथे देशातील सर्व धर्मीय सर्व जातीय जनतेच्या प्रमुख उपस्थित देशभक्ती कार्यक्रम मोट्या जल्लोष्यात साजरी करण्यात आला. यावेळी भारत माता सह राष्ट्र महापुरुषांचा प्रतिमेयस जय भारत माता सेवा समितीच्या वतीने पुष्पांजली अर्पण करून दीप प्रज्वलित करण्यात आला.

या प्रसंगी संविधानाची शपथ घेऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आला.या प्रसंगी राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या अमृत हस्ते हेरिटेज लॉन कार्यलय मालक यांनी मोफत हॉल व मोफत महाप्रस-ादचा व्यवस्था केल्याबद्दल हेरिटेज लॉन मालकांची विशेष सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी कामगारांचे आणि विविध क्षेत्रात यश मिळविणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात सहभागी झालेल्या देशभरातील हज-ारों देशभक्तांनि पुरी जिलेबी भात सांबर सह खास महाराष्ट्रीन थाळी आणि इतर अनेक गोड खाद्यपदार्थ महाप्रसादचा आस्वाद घेऊन जल्लोष साजरा केला. कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थानच्या विविध भागांतून समितीचे कार्यकर्ते आणि बुद्ध,शिव,बसव आंबेडकरांचे अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



दैनिक
यश सिद्धि न्यूज



# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे वार्षिक निकाल जाहीर; शाळा १५ जूनला भरणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी तालुका कळंब येथील शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक निकाल जाहीर करण्यात आला यावेळी गावातील पालक आणि शाळेतील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

विद्यार्थ्यांनी गेले वर्षभर घेतलेली मेहनत आणि कष्ट याचा लेखाजोखा या निकालामध्ये दिसून आला. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सर्वश्री सुनील काळे, महावीर डीकले , उत्रेश्वर सावंत, जुबेर पठाण यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रगती पत्रकाचे वाटप करण्यात आले. यावेळी अंगणवाडी सेविका मंदाकिनी गणेश खोसे, सुरेखा तानाजी काळे, मदतनीस शिल्पा माने, सागरबाई लिमकर आणि आशा कार्यकर्ती अनिता काळे उपस्थित होत्या.

शाळेचे मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांनी एक मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन याबद्दल उपस्थिताना विशेष माहिती दिली. शाळेने यावर्षी प्रथमच प्रिंटेड,फोर कलर, विद्यार्थी, व वर्ग मित्रासह फोटो असलेले सुंदर अणि आकर्षक प्रगती पत्रक विद्यार्थ्यांना दिले. याबाबतचे कुतूहल आणि चेहऱ्यावर दिसून आला.

शाळेचे सहशिक्षक श्री संतोष मोहिते, सयाजी शिंदे, आशा पवार आणि रसिका आगरकर यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छाआहेत दिल्या . पुढील वर्षी शाळा पंधरा जून पासून सुरू होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरमुळे ग्रामीण भागात विकासाला चालना मिळणार; डॉक्टर काकोडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ग्रामीण भागाच्या विकासाकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लक्ष केंद्रित केले आहे. ग्रामीण भागात विविध व्यवसाय सुरू व्हावेत व ग्रामीण भागातील तरुणांना व्यवसाय करण्याची संधी मिळाली. ग्रामीण भागाच्या विकासाला व अर्थकारणाला ज्यांना मिळणार आहे. यासाठी अटल कम्युनिकेशन इनोव्हेशन सेंटर सुरू करण्यात आले आहे. पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर येथील विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये हे सेंटर उभे करण्यात आले आहे. त्याचा फायदा ग्रामीण भागातील तरुणांना होणार असल्याची माहिती डॉक्टर अनिल काकोडकर यांनी दिली

भोपाळपूर येथील विठ्ठल ना अभियांत्रिकी महाविद्यालयात अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरचे उद्घाटन डॉक्टर अनिल काकोडकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार समाधान आवताडे व विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर बीपी रोंगे, डॉक्टर प्रशांत पवार एम एस पवार, इत्यादी उपस्थित होते.

यावेळी आमदार समान अवताडे म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संशोधनावर काम केले आहे. लय दिशा मधून विविध वस्तू माहिती करून घेऊन त्यामुळे भारतातील कोट्यावधी रुपये प्रदेशात जात आहे. वेलकम भारतामधील भारताचे अर्थकारण वाढावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे. विविध तंत्रज्ञानाचा प्रोत्साहन देण्याची काम लक्ष केंद्रित केले आहे . यावेळी डॉक्टर अनिल काकोडकर म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे ग्रामीण भागापर्यंत तंत्रज्ञान पोहोचणार आहे. ग्रामीण भागातील तरुणांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती करून देण्यासाठी ग्रामीण भागातील विकास व विद्यार्थ्यांना आणि नवीन उद्योजक तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील तरुणांना हाताला काम देण्याची काम करावे असेही त्यांनी म्हटले आहे. या सेंटरचे काकोडकर यांनी म्हटले आहे ही याचा सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात त्याचा फायदा होईल असेही त्यांनी सांगितले आहे.

# निफाडमध्ये अतिक्रमित शिवरस्ते मोकळे होणार; तहसीलदारांचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील गांव नकाशाप्रमाणे अतिक्रमित अथवा बंद झालेले शिवरस्ते, गाडी रस्ते, पाणंद, पांधण, शेतरस्ते आणि शेतावर जाणारे पायमार्ग मोकळे करण्यासाठी तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी संबंधित यंत्रणेला आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी होणारा त्रास दूर होणार असून अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे आहेत.



जिल्हाधिकारी नाशिक, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभाग तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या निर्देशानुसार, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाने मोजणी करून हद्दी निश्चित केलेल्या शिवरस्त्यांची यादी तहसील कार्यालयाला प्राप्त झाली आहे. या रस्त्यांवरील अतिक्रमणे पोलीस बंदोबस्तात हटवून रस्ते खुले करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे. यासाठी संबंधित मंडळ अधिकाऱ्यांना या मोहिमेसाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. संबंधित शेतकऱ्यांना नियोजित तारखेच्या सात दिवस आधी नोटीस देण्यात येणार असून, स्वखर्चाने अतिक्रमण काढून घेण्याचे निर्देश दिले जाणार आहेत. अन्यथा, नियोजित दिवशी पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण हटविण्याची कारवाई केली जाईल.

कारवाईपूर्वी संबंधित रस्त्यावरकोणत्याहीन्यायालयाचा स्थगिती आदेश नसल्याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, रस्ता खुला करताना आणि कारवाई पूर्ण झाल्यानंतर जिओ - टॅगिंगसह छायाचित्रे घेऊन सविस्तर अहवाल तहसील कार्यालयात सादर करावा लागणार आहे.

भूमी अभिलेख, पंचायत समिती, पोलीस विभाग, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि शिवपाणंद रस्ते चळवळ समितीच्या सदस्यांना संबंधित तारखांना उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे या मोहिमेला प्रशासन, पोलीस आणि ग्राम स्तरावरील यंत्रणेचे संयुक्त बळ मिळणार आहे.

**निफाड तालुक्यातील शिवरस्ते मोजणी दौरा**

दि.१५ मे :- नांदुर्डी - पंचकेश्वर शिवरस्ता

दि.१९ मे :- कसबे सुकेणे - वडाळी, तळवाडे - पाटपिंपरी, रुई - कोळगाव, घुमरे वस्ती ते कुंदेवाडी, ब्राम्हणवाडे - जुना सोमठाणे, विष्णुनगर - डोंगरगाव, वडनेरभैरव - शिरवाडेवणी शिवरस्ते

दि.२१ मे :- नांदूर्डी - कुंदेवाडी, मांजरगाव - म्हाळसाकोरे, कोकणगाव - शिरसगाव शिवरस्ते

दि.२५ मे :- जुना कसबे सुकेणे - पिंपरी शिवरस्ता, नांदगाव - देवगाव, मांजरगाव चौफुली ते गोदावरी नदी, पाचोरे वणी ते पिंपळगाव रस्ता

दि.२८ मे :- दावचवाडी - कुंभारी शिवरस्ता, मांजरगाव - खानगाव खडी शिवरस्ता, धारणगाव खडक - दत्त मंदिर - जुने शिवरे, औरंगपूर - श्रीरामपूर शिवरस्ता.

# सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी परीक्षेचा ८६.५७% निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ८७.५७% लागला आहे विज्ञान विद्या शाखेचा निकाल १०० % लागला असून यश बागलकोटी हा विद्यार्थी ७४.६७ % घेऊन प्रथम आला, शंकर नीळ व राजनंदिनी ताकमोगे या दोघानी ७३.३३ % घेऊन द्वितीय तर सिद्धाराम कोरे हा विद्यार्थी ७२ टक्के घेऊन तृतीय आला आहे.

कला विद्या शाखेचा निकाल ६८.५७ % लागला असून कु सपना चेंडके ७८.८३ घेऊन प्रथम आली, विजयालक्ष्मी चेंडके ६६.६७% घेऊन दुसरी तर महेक कारंजे ६४.६७ % घेऊन तिसरी आली आहे.

वाणिज्य विद्याशाखेचा ७९.०६ % निकाल लागला असून कु आदिती कटारे ही ७५% मिळवून प्रथम आली, कु समीक्षा मोरे ७३.८३% मिळवून दुसरी तर कु स्नेहा भिकमळी ७१.५०% गुण मिळवून तिसरी आली आहे.

विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागल्याने महाविद्यालयाची परंपरा कायम राखली आहे.

यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी सचिव मल्लिकार्जुन मसुती जुनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांनी अभिनंदन केले आहे.




# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ईटकुरमध्ये साडी वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ईटकुर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील ईटकुर येथे .डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त समाजसेवक, अन्नदाते, विजयकुमार अण्णासाहेब रणदिवे आणि सुधीर उर्फ अतुल मुकुंद शिंदे या दोन समाजसेवकाने ६० वर्षापुढील जेष्ठ महिलांना ईरकल साड्यांचे आदरपूर्वक वाटप करण्यात आले असून, व्रद्धांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि आशीर्वाद हीच आमच्या कार्याची खरी प्रेरणा आणि संपत्ती आहे. समाजाने दिलेले ऋण फेडण्याचा हा एक छोटासा प्रयत्न केला आहे. असं विजयकुमार रणदिवे आणि सुधीर शिंदे या दोन्हीही समाज सेवकानी मुलाखतीत सांगितलं.





या दोघांनी पूर्ण एप्रिल महिन्यामध्ये एकूण २०० साड्यांचे वाटप केले आहे.२०२५ च्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लागोपाठ दोन दिवस समाजाला अन्नदान केले.खरोखरच या मोठ्या मनाच्या अन्नदात्यांचे समाजाने कौतुकाची थाप दिली. खरोखरच अशी चांगली कामे करणारी लोकं समाजामध्ये बोटावर मोजन्याइतकीच असतात, बरं हे दोन व्यक्ती करतात तरी काय पुणे, मुंबई सारख्या ठिकाणी प्रायव्हेट जॉब, परंतु मन मोठ लागतंय, अशा देव माणसांना समाजाचा सलाम त्यावेळेस समाजाने त्यांचा सत्कारही केला, नेताजी सुभाष चंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ चा मिळालेले सुधाकर रणदिवे व नोटरीची मान्यता मिळालेले ऍड, सतीशकुमार अण्णासाहेब रणदिवे यांचा सुद्धा सत्कार या वेळी करण्यात आला.

# कामगारांनी अत्याधुनिक कौशल्य आत्मसात करावीत : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : राज्यातील कामगार कष्टाळू आहे, प्रचंड मेहनत घेतात काम प्रती त्यांची श्रद्धा निष्ठा वाखाण्याजोगी असते परंतु इतर राज्याच्या कामगाराच्या तुलनेत त्यांच्याकडे कौशल्याची कमतरता आहे, म्हणून त्यांनी अत्याधुनिक कौशल्य आत्मसात करून स्वतः चे अस्तित्व सिद्ध करावे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात कॉमर्स असोसिएशन भित्तिपत्रक प्रकाशन

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील कॉमर्स असोसिएशनने महाराष्ट्र दिनानिमित्त कामगारांच्या जीवनावर प्रकाशित केलेल्या भित्तिपत्रकाचे प्रकाशन केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते

### भित्तिपत्रकातील विषय

**कॉमर्स असोसिएशनच्या भितीपत्रका मध्ये प्राध्यापिका सोनाली कटकधोंड यांच्या मार्गदर्शनानुसार नारायण मेघाजी लोखंडे जीवनचरित्र, रविवारच्या सुट्टीचा इतिहास, कामगार चळवळीचा इतिहास, इंग्रज काळातील कामगारांचे जीवन, आधुनिक काळातील कामगारांची स्थिती, महिला कामगारांची सद्यस्थिती या विषयावर विद्यार्थ्यांनी लेख लिहिले.**



पुढे बोलताना ते म्हणाले की, बिहार, उत्तर प्रदेश येथील कामगारांनी बांधकामातील कौशल्य आत्मसात केली आहेत, त्यामुळे त्यांना राज्यातील कामगारापेक्षा कामाचा जास्त मोबदला मिळतो हे लक्षात घेऊन राज्यातील कामगारांनी पारंपारिकता सोडून आधुनिक कौशल्याभिमुख दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे तरच त्याच्या अर्थार्जनास गती प्राप्त होईल.

मल्लिकार्जुन मसुती म्हणाले की, कामगारांची अवस्था अत्यंत बिकट आहे. जुने तेच सोने अशी त्यांची प्रवृत्ती आहे, आधुनिकतेचा स्वीकार करण्यास ते तयार नाही आधुनिक कौशल्य आत्मसात करून नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्यास ते इतर राज्य कामगारांच्या तुलनेत अर्थार्जनामध्ये अग्रेसर होतील.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संपादक प्राध्यापिका सोनाली कटकधोंड यांनी केले सूत्रसंचलन प्रा जनाबाई चौधरी यांनी केले आभार प्रा शितल फुटाणे यांनी मानले कार्यक्रमास प्राध्यापक ओंकार घिवारे, राजशेखर पवार, डॉ शितल झिंगाडे, सौरभ भस्मे, मनीषा शिंदे उपस्थित होते.

# बोरामणी येथे अक्कलकोटचे माजी आमदार तथा माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त परिवारातर्फे सर्वधर्मीय मोफत सामुदायिक विवाह उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथे सलग १४ वर्षापासून अक्कलकोटचे माजी आमदार तथा माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम मैत्री यांच्या वाढदिवसानिमित्त धनेशा चलाने मित्र परिवाराच्या वतीने शुक्रवार एक मे रोजी सायंकाळी सहा वाजून ३२ वाजता गोरज मुहूर्तावर सर्वनाम्य मोफत सामुदायिक विवाह सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला यावर्षी या सोहळ्यात पाच जोडक्यांचा विवाह विधिवत संपन्न झाला. या उपक्रमाची माहिती देताना मुख्य संयोजक्ता पंचायत समितीचे माजी सदस्य धनेश असणारे यांनी सांगितले की मेहत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी हा विवाह सोहळा सोहळ्याचे आयोजन करण्यात येते केल्या १४ वर्षापासून सातत्याने सुरू असलेल्या या उपक्रमातून आतापर्यंत तब्बल २७३ दोडक्यांचे विवाह पार पडले असून हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे सोहळ्यात काशी पिठाचे जगद्गुरु डॉक्टर मल्लिकार्जुन विश्वराध्या शिवाचार्य स्वामीजी यांनी उपस्थिती मार्गदर्शन करत समाज हितासाठी राबविण्यात येणारे असे उपक्रम अत्यंत पुण्याचे असून यासाठी आमचा नेहमीच पाठिंबा राहील असे मत व्यक्त केले यावेळी सिद्धाराम मैत्री यांनी मनोगत व्यक्त करण्यांना सांगितले की दरवर्षी ८ एप्रिल रोजी वाढदिवसानिमित्त हा उपक्रम घेतला जातो मात्र यंदा काही कारणास्तव एक मे रोजी आयन करण्यात आले विशेष म्हणजे हाच दिवस माझ्या वैवाहिक वाढदिवसाचाही असल्याने हा शान अधिक अन्नदाताई ठरलाय असे मत त्यावेळी बोलताना व्यक्त केले सोलापूरचे नूतन खासदार ज्योतीताई वाघमारे यांनीही या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत गरजू कुटुंबियांसाठी हा विवाह सोहळा मोठ्या आजार असून असा उपक्रम यापुढे अखंड सुरू राहावा अशी अपेक्षा व्यक्त केली

तसेच उपस्थितीत वाढीसाठी भोजनाची व्यवस्था उत्तम व्यवस्था करण्यात आली होती विशेष म्हणजे विवाह नंतर पहिली कन्या झाल्यास तिच्या नावाने पाच हजार रुपये ची बँक ठेव करण्याची अभिनव योजना देखील राबविण्यात आली येत आहे या उपक्रमास अमर पाटील प्रथमेश म्हेत्रे जिल्हा परिषद सदस्य शिवराज मैत्री आनंद तानवडे सुनील बनसोडे बाळासाहेब वाघमारे केदार उंबर्जी तसेच बोरामणी परिसरातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते तहसील कार्यालय प्रांगणात ध्वजारोहण





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या राज्य स्थापना दिनानिमित्त तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते शुक्रवार, दिनांक १ मे २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता शासकीय ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी पंचायत समिती सभापती शुभम आगवणे, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, वैभव बुचके, दीपक शिंदे, मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम, स्वातंत्र्य सैनिक, शासकीय अधिकारी-कर्मचारी, पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वंदे मातरम गीत राष्ट्रगीत व राज्यगीत गायन झाले. तसेच आणीबाणीच्या काळात बंदीवास सोसावा लागलेल्या पंढरपूर तालुक्यातील व्यक्तींचा आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## जनगणना; स्वयं-गणना प्रक्रियेत आमदार समाधान आवताडे यांनी नोंदवला सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार पंढरपूर तालुक्यात दि.०१ मे, २०२६ पासून डिजीटल जनगणना मोहिमेला प्रारंभ झाला आहे. पहिल्या टप्प्यात तालुक्यातील प्रत्येक घराची तसेच कुटुंबातील मूलभूत सुविधांची माहिती संकलित केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या राज्य स्थापना दिनानिमित्त दि.०१ मे २०२६ रोजी आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणिती भालके, नगरसेवक व मान्यवर पदाधिकारी यांनी शासनाच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन स्वयं-गणना करून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवला असल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी जनगणनेबाबतची माहिती उपस्थितांना देवून, नागरिकांनी शासनाच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन स्वयं-गणना करून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.

## बारावी परीक्षेत पुणे विभागाचा ९३.३४ टक्के निकाल: राज्यात दुसऱ्या क्रमांकावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : बारावी परीक्षेचा निकाल आज दोन मे जाहीर करण्यात आला राज्यात पुणे विभागाचा निकाल ९६.३४% लागला असून राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे बारावी निकालाला पुन्हा एकदा कोकण विभागाने बाजी मारली आहे. विद्यार्थ्यांना सात वेगवेगळ्या वेबसाईटवर आपला निकाल पाहता येणार आहे.

यावर्षी राज्याच्या एकूण निकाल ९१.८७% लागला आहे गेल्या वर्षीचा ९३.२९ च्या तुलनेने यात १.४२% ची घट झाली आहे. मुली मुलापेक्षा पाच पॉइंट ५९ टक्क्यांनी जास्त उत्तीर्ण झाले आहेत सर्व नव विभागांवर मंडळांमध्ये कोकण विभाग ९७.५१% निकालासह प्रथम क्रमांकावर आहे सर्वात कमी निकाल लातूर विभागाचा लागला आहे.

## महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त ध्वजारोहण संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांच्या हस्ते ध्वजारोहण समारंभ उत्साहात संपन्न झाला.



यावेळी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), तसेच विभाग प्रमुख संजय कोकीळ, राजेंद्र सुभेदार, पांडुरंग बुरांडे, राजेश पिटले, राजाराम ढगे, राजेश तेलतुंबडे, राजेंद्र घागरे, सावता हजारे, दादा नलवडे व मंदिर समितीचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेस अलंकार परिधान**

महाराष्ट्र दिनानिमित्त श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेस पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले.

श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, हिऱ्याचे कंगन जोड, दंडपेट्या, मोत्याची कंठी, शिरपेच, मोत्याचा तुरा, मत्स्य जोड, तुळशीची माळ, तोडे, तांदळ्या हार, पदकासह लॉकेट, मोहरांची माळ आदी अलंकार परिधान करण्यात आले.

तसेच श्री रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या जोड, तोडे, तानवड जोड, तांबडी चिंचपेटी, जवमनी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी व कंबरपट्टा आदी अलंकार परिधान करण्यात आले.

## पुढील काळात हंगामासाठी कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याकडे दहा लाख हेक्टर उसाची नोंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कर्मवीर सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याकडे २०२६ २७ साठी होणाऱ्या गाळप हंगामासाठी दहा लाख टन ऊसाची नोंद झाल्या असल्याची माहिती माजी आमदार व कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी दिली आहे. पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या २०२६ २७ च्या मिल रोल पूजनाचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या शुभहस्ते करण्यात आले कारखान्याचे व्हाईस चेअरमन कैलास खुळे सर, संचालक मंडळ व कार्यकारी संचालक यशवंत कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी पांडुरंग सहकारी साखर कारखाने चांगला दर दिला आहे त्यामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. सन २०२६ २७ हंगाम गाळपाचे नियोजन कारखान्याने केले आहे. उसाचे उत्पादन वाढवण्यासाठी कारखान्याने हे आय तंत्रज्ञान शेतकऱ्यांना दिले आहे. याचा वापर करून शेतकऱ्यांनी उसाची लागवड करावी व सध्या कारखान्याकडे सध्या कारखान्याकडे दहा लाख हेक्टर उसाच्या नोंदी आल्या आहेत. उसाचे गाळप करणार आहे व यावर्षीही शेतकऱ्यांना उसाला चांगला दर देण्याचे प्रयत्न कारखाना करीत आहे असे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले.

## कोविड-१९ कालावधीतील N+2 बाधित विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षा संधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त) येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२१-२२ या कालावधीत प्रवेश घेतलेल्या N+2 बाधित विद्यार्थ्यांना कोविड-१९ महामारीमुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचा मोठा फटका बसला होता. तसेच वेळोवेळी लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित झाले व काहींना आपले अभ्यासक्रम पूर्ण करता आले नाहीत.



या पार्श्वभूमीवर, ज्या N+2 बाधित विद्यार्थ्यांना आपला अभ्यासक्रम पूर्ण करता आलेला नाही, अशा विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडील परिपत्रक क्र. पुअहोसोविसो/अभ्यासमंडळे/२०२६/३८३३, दिनांक २८ एप्रिल २०२६ अन्वये अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विशेष परीक्षा संधी (Special Chance) देण्यात आलेली आहे.

या निर्णयामुळे कोविड काळात शैक्षणिक नुकसान झालेल्या N+2 बाधित विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असून त्यांना आपले शैक्षणिक भविष्य पूर्ण करण्याची नवी संधी प्राप्त होणार आहे.

परीक्षा अर्ज (Exam Form) भरण्याबाबतची सविस्तर माहिती महाविद्यालयाच्या परीक्षा विभागामार्फत लवकरच स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती महाविद्यालय प्रशासनाने दिली आहे. तरी संबंधित विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परीक्षा विभागाशी दि. १५ मे पर्यंत संपर्क साधावा.

ही सुविधा विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार लागू करण्यात येत असून पात्र N+2 बाधित विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ बी. टी. जाधव यांनी केले आहे.

# आर्यारवी एंटरटेनमेंटचा चौथा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव मुंबईत दिमाखात संपन्न

**भीमराव पांचाळे, सतीश पुळेकर, के. राघवकुमार आणि प्रभाकर तोडणकर यांना 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई प्रतिनिधी/केतन भोज : लघुपट निर्माते, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या 'आर्यारवी एंटरटेनमेंट' आयोजित चौथ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा ३० एप्रिल रोजी परेल येथील शिरोडकर हायस्कूलमध्ये अत्यंत उत्साहात पार पडला. चित्रपट, नाट्य आणि साहित्य क्षेत्रातील दिग्गजांच्या उपस्थितीने या सोहळ्याला विशेष झळाळी प्राप्त झाली होती. या महोत्सवात त्यांच्या संबंधित क्षेत्रातील बहुमूल्य योगदानाबद्दल खालील मान्यवरांना 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले :

भीमराव पांचाळे (प्रसिद्ध गझल गायक - गझल नवाज)

सतीश पुळेकर (ज्येष्ठ अभिनेते व दिग्दर्शक)

के. राघवकुमार (ज्येष्ठ नाट्यकर्मी)

प्रभाकर तोडणकर (ज्येष्ठ समाजसेवक)

कार्यक्रमाचा शुभारंभ सुनील शिर्के (संस्थापक, शिर्के जनकल्याण प्रतिष्ठान) यांच्या हस्ते नारळ वाढवून आणि मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला. कवी शब्दश्री विलास देवळेकर यांनी सादर केलेल्या भारदस्त 'गाऱ्हाण्याने' सोहळ्याची मंगलमय सुरुवात झाली. आयोजक महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी प्रास्ताविकातून महोत्सवाचा उद्देश स्पष्ट केला, तर एका व्हिडिओ फितीच्या (AV) माध्यमातून या सोहळ्याचा तीन वर्षांचा प्रवास उलगडण्यात आला. याप्रसंगी गझल नवाज भीमराव पांचाळे यांनी गझल गाऊन उपस्थित मान्यवर आणि रसिकांची दाद मिळवली. आपले मनोगत व्यक्त करताना भीमराव पांचाळे म्हणाले की, महेश्वर तेटांबे हे नवीन कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्याचे मोलाचे कार्य करत आहेत. विजेत्यांना रोख रक्कम देऊन प्रोत्साहित करण्याचा त्यांचा उपक्रम कौतुकास्पद आहे.




ज्येष्ठ अभिनेते सतीश पुळेकर म्हणाले की, जीवनगौरव पुरस्काराने जरी मला सन्मानित केलं तरी अजूनही काम करण्याची ऊर्मी माझ्यात आहे. आणि महेश्वर तेटांबे हे नवीन कलाकारांना त्यांचं मनोबल वाढवण्यासाठी जे प्रोत्साहन आणि व्यासपीठ मिळवून देत आहेत ही कौतुकास्पद कामगिरी आहे. या सोहळ्यात विनोदवीर आशिष सातपुते, एम नटराज, संदीप भाकरे, समीर काळबे आणि नृत्यांगना कु. ग्रीष्मा वहाळकर यांच्या सादरीकरणाने रंगत आणली. प्रसिद्ध अभिनेते व मुलाखतकार मयूर धुरी यांनी आपल्या ओघवत्या शैलीत प्रभावी सूत्रसंचालन केले. व्यासपीठावर अभिनेते कांचन पगारे, अभिनेत्री सिद्धी कामथ, गुरुनाथ तिरपणकर, उद्योजक खलील शिरगावकर, लेखक - दिग्दर्शक अनंत सुतार आणि अभिनेत्री लक्ष्मी गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी अविनाश राऊत, निलेश घाडी, राहुल शिंदे, पत्रकार केतन भोज आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी महेश्वर तेटांबे यांनी भावूक होत सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले, चांगला स्वभाव हा गणितातल्या शून्यासारखा असतो; त्याला स्वतःला किंमत नसते, पण दुसऱ्यासोबत जोडला तर त्याची किंमत वाढते. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादामुळेच हा प्रवास इथवर पोहोचला आहे. राष्ट्रगीताने या सोहळ्याची सांगता झाली.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात संत तुकडोजी महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रम**

# संत तुकडोजी महाराजांची विचारसरणी अनुसरून भोंदू लोकांविरुद्ध जनजागृती व्हावी : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : संत तुकडोजी महाराजांनी अंधश्रद्धा अनिष्ट प्रथा तसेच जातीव्यवस्थेवर प्रहार केला, लोकांना वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्यास प्रवृत्त केले. ग्रामगीता, खंजिरी भजनाद्वारे जनजागृती केली. आज परिस्थिती बदललेली असली तरी भोंदू लोकांचा सुळसुळाट वाढला आहे, म्हणून महाराजांची विचारसरणी अनुसरून भोंदू लोकाविरुद्ध जनजागृती झाली पाहिजे, असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाने आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, अलीकडे देवधर्म, रूढी परंपरा वाढत चालली आहे, लोक अंधश्रद्धेच्या आहारी गेली आहेत, त्यांचे स्वच्छता, शिक्षण, सहकार्य, आत्मनिर्भरता, सेवा, त्याग आणि प्रामाणिकपणा याकडे दुर्लक्ष झाले आहे. त्याचा गैर फायदा भोंदूगिरी करणारे लोक घेत आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले तर सूत्रसंचलन प्रा सौरभ भस्मे यांनी केले. आभार प्रा मधुबाला लोणारी यांनी मानले कार्यक्रमास प्राध्यापिका सलोनी शहा, हर्षदा गायकवाड, शितल फुटाणे, राजकुमार गवळी, गुरुशांत हपाळे, लक्ष्मण लिगाडे, शिवकुमार मठ देवरू आदी उपस्थित होते.

# निफाड नगरपंचायतच्या वतीने महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिन . ०१मे २०२६ रोजी सकाळी निफाड नगरपंचायत कार्यालयाच्या आवारात ध्वजारोहण नगराध्यक्षा कांताबाई अशोकराव कर्डिले यांचे हस्ते करण्यात आले. कामगार दिनाचे औचित्य साधून निफाड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी धीरज भामरे यांनी सेवानिवृत्त होणारे पाणीपुरवठा कर्मचारी प्रमोद उगलमुगले, व सफाई कर्मचारी मालनबाई शिंदे यांना ध्वजारोहन ठिकाणी व्यासपीठावर बोलावून त्यांचा सन्मान केला कर्मचारी यांचा प्रथमच ध्वजारोहन ठिकाणी बोलावून सन्मान केल्याने समाधान व्यक्त केले, असून नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष, नगरसेवक / नगरसेविका व ग्रामस्थ यांचेकडून भामरे यांचे कौतुक करण्यात येत आहे. कर्मचारी संघटनेकडून आभार मान्यात आले. या प्रसंगी वैनतेय शाळेचे विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताचे गायन केले नगरपंचायतीचे, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, मुख्याधिकारी धीरज भामरे, नगरसेविका , रत्नमालाताई कापसे, डॉक्टर कविता धारराव, शारदा कापसे, तसेच नगरसेवक साहेबराव बर्डे सर,नगरसेवक सागर कुंदे, किशोर ढेपले, स्वी.नगरसेवक सागर गीते, स्वी.नगरसेवक बंटी शिंदे, व शहरातील प्रतिष्ठित नागरिक माजी नगरसेवक मुकुंद होळकर, आसिफ पठाण, संपतराव धारराव व नगरपंचायतचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



**सेवानिवृत्त होणार्या कर्मचाऱ्यांचा व्यासपीठावर सन्मान**

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# कळंबमध्ये महावितरणच्या सबस्टेशनला भीषण आग; शहरासह ग्रामीण भाग अंधारात

## अधिकाऱ्यांची अनुपस्थिती उघड, नागरिक संतप्त; कारवाईची जोरदार मागणी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब शहरासह ग्रामीण भागाला वीज पुरवठा करणाऱ्या महावितरणच्या मुख्य सबस्टेशनला आज दुपारी दोनच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत ट्रान्सफॉर्मर चे मोठे नुकसान झाले आहे. शहरासह ग्रामीण भागाला वीज पुरवठा करणारा मोठा डीपी पूर्णपणे जळून खाक झाला असून, शहराला पुरवठा करणाऱ्या डीपीचेही मोठे नुकसान झाले आहे.

या घटनेमुळे दुपारी साधारण दोन वाजल्यापासून कळंब शहरासह परिसरातील वीज पुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. वीज पुरवठा कधी पूर्ववत होईल याबाबत मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. नागरिकांचे दैनंदिन व्यवहार ठप्प झाले असून उन्हाच्या तडाख्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

**अधिकारी गायब; संपर्कही नाही!**

या घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे आग लागली त्या वेळी संबंधित कार्यालयात एकही सक्षम अधिकारी उपस्थित नव्हता. नागरिकांनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मोबाईल बंद असल्याचे आढळले. तर कनिष्ठ अभियंत्याने फोन उचलण्याचे टाळल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. संकटाच्या वेळी जबाबदार अधिकारीच हजर नसल्याने प्रशासनाच्या निष्काळजीपणावर मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे.

**वारंवार घटना; तरीही धडा नाही!**

काही दिवसांपूर्वीच शहरातील बस स्टॉपजवळील डीपीला आग लागण्याची घटना घडली होती. त्यावेळी मोठी दुर्घटना थोडक्यात टळली होती. मात्र, त्यानंतरही महावितरणने कोणतीही ठोस उपाययोजना न केल्यामुळे आजची गंभीर घटना घडल्याचा आरोप नागरिक करत आहेत. देखभाल-दुरुस्तीकडे होणारे दुर्लक्ष हेच या आगीमागचे कारण असल्याचे नागरीकांमधुन बोलले जात आहे.

नागरिकांचा संताप उफाळला*

या घटनेनंतर कळंब शहरात मोठी खळबळ उडाली असून, महावितरणच्या कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या बाबत ड. मनोज चोंदे, यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, वारंवार वीज खंडित होते, तक्रार केली तरी अधिकारी लक्ष देत नाहीत. आज तर आग लागली तरी कोणी जबाबदार अधिकारी हजर नव्हता. ही सरळ निष्काळजीपणा आहे!

**चौकशी व कारवाईची मागणी**

नागरिकांनी या घटनेची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या तात्काळ बदल्या कराव्यात, निष्काळजीपणाबद्दल निलंबन किंवा बडतर्फी करावी आणि वीज पुरवठा व्यवस्थेत तातडीने सुधारणा करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली**

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल व कळंब पोलिस ठाण्याचे पोलिस यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत डीपी आणि इतर यंत्रणेचे मोठे नुकसान झाले होते.

**सहाय्यक अभियंत्यांची प्रतिक्रिया**

याबाबत महावितरणचे सहाय्यक अभियंता सौरभ टाखरखेडे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, मी जरा बाहेर होतो. ही घटना कशी घडली, का घडली याबाबत मला अद्याप काही माहिती नाही. याची सखोल माहिती घेऊन त्यात काही उपाययोजना करता येतील का, ते आता आम्ही पाहणार आहोत. त्यामुळे रात्री वीजपुरवठा सुरळीत होईल का नाही हे मी आता सांगू शकत नाही.

महावितरणचा ढिसाळ कारभार आणि अधिकाऱ्यांची बेपर्वाई यामुळे कळंब शहर अंधारात ढकलले गेले आहे. आता तरी वरिष्ठ प्रशासन जागे होणार का, की नागरिकांना अजूनही अशाच संकटांना सामोरे जावे लागणार, हा सवाल उपस्थित होत आहे.

---

# युद्ध नको बुद्ध हवा हीच तत्त्वप्रणाली स्वीकारावी : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



**कल्याणशेट्टी महाविद्यालयात गौतम बुद्ध जयंती निमित्त कार्यक्रम**

अक्कलकोट : गौतम बुद्ध यांनी मानवतेची शिकवण दिली, त्यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार संपूर्ण जगात झाला परंतु आता त्यांच्या शिकवणुकीचा विसर पडल्यामुळे विध्वंसक जागतिक युद्ध सुरू झाले आहे, हे युद्ध थांबवायचे असेल तर युद्ध नको बुद्ध हवा ही तत्व प्रणाली स्वीकारली पाहिजे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गौतम बुद्ध जयंती निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, इराण अमेरिका युद्धामुळे जगामध्ये अशांतता आहे. पेट्रोल गॅस च्या किमती भडकले आहेत, जीवघेणी स्पर्धा विकोपाला गेली आहे, अशा परिस्थितीत गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान आचरणात आणून जगातील मानव जातीस दिलासा देण्याची भूमिका जागतिक राजकारण्यांनी घेतली पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले आभार कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी मानले कार्यक्रमास प्रा मनीषा शिंदे, प्रा शितल फुटाणे, प्रा जनाबाई चौधरी, प्रा हर्षदा गायकवाड, प्रा सौरभ भस्मे प्रा ओंकार घिवारे, प्रा शिवकुमार मठदेवरु उपस्थित होते.

---

# उगाव महाविद्यालयाचा बारावीचा कला शाखेचा ८३.३३ % निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय, उगाव येथील इयत्ता बारावी चा परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून कला शाखेचा एकूण निकाल ८३.३३'/. टक्के लागला असुन या यशस्वी निकालामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्ग आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले.

यंदाच्या परीक्षेत प्रथम पाच विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले आहे.

प्रथम क्रं. कु. वृषाली सुरेश निकम हिने ६९.०० टक्के गुण मिळवून यश संपादन केले. तर द्वितीय क्रं. कु. माधुरी संतोष गांगुर्डे हिला ६१.८३ टक्के गुण मिळाले. तृतीय क्रं. कु. रेणुका सुधाकर कराटे हिने ५८.६७ टक्के गुण मिळविला आहे. चौथ्या क्रं.कु. मनिषा नवनाथ मोरे हिने ५८.६७ टक्के गुण मिळविले, तर पाचव्या क्रं. कु. अनुष्का केदु लहांगे हिने ५५.०० टक्के गुण मिळवून यशाची नोंद केली

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष.गुलाबराव(आणणा) जोंधळे,सचिव/कार्याध्यक्ष .दत्ताभाऊ जोंधळे ज्येष्ठ मार्गदर्शक .दीपकभाऊ जोंधळे प्राचार्य कैलास गवळी पर्यवेक्षक नंदाराम ढिकले,प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्तेचा हा निकाल उत्तम पुरावा असल्याचे मत व्यक्त करण्यात आले

---

# कळंब येथे बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब शहरातील लुम्बिनी बौद्ध विहार येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त तथागत गौतम बुद्ध यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात त्रिशरण, पंचशील व बुद्ध वंदनेने झाली. त्यानंतर पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. उपासक उपासिकांनी खीर दान करून जयंतीचा आनंद उत्साहात साजरा केला.

**लुम्बिनी बौद्ध विहारात पंचशील ध्वजाचे ध्वज रोहण व खीर दान आयोजन**

या कार्यक्रमात महिलांचा सहभाग लक्षणीय होता. यावेळी मनीषा बनसोडे, गंगाबाई गायकवाड, नलिनी बनसोडे, अर्चना हौसलमल, चांदणी गायकवाड, लक्ष्मी वाघमारे, सुषमा वाघमारे, प्रीती हौसलमल, माया बनसोडे, मनीषा गायकवाड, कमलबाई भालेराव, प्रज्ञा गायकवाड, स्नेहा वाघमारे, सबुरी गायकवाड, आराध्या हौसलमल, सांची गाडे, श्रद्धा गायकवाड, काजल कांबळे, स्वरा डावरे व तनिष्का लोंढे यांनी पुढाकार घेत कार्यक्रम यशस्वी केला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सतपाल बनसोडे, राहुल हौसलमल, सुशील वाघमारे, दादा बनसोडे, अभिषेक जाधव, सुरज जानराव, लाला कांबळे, साई गायकवाड, मिलिंद गाडे, राहुल गायकवाड, संभव बनसोडे, दीपक गायकवाड, हर्षल वाघमारे आदी उपस्थित होते. बुद्धांच्या करुणा, शांती व समतेच्या संदेशाचा जागर करत हा उत्सव सोहळा पार पडला.

---

# आरटीई अंतर्गत प्रवेश देण्यासाठी लाच घेणारा एजंट गजाआड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पुणे : गरीब मुलांना चांगल्या शाळेत शिकता यावे यासाठी राज्य सरकारने शिक्षण हक्क कायदा केला. त्यामुळे एरवी त्या शाळेची फी परवडली नसती अशा शाळांमध्ये असंख्य गरीब मुले शिकू लागली. मात्र त्यांच्या शिक्षण हक्कामध्ये आता 'झारीतील शुक्राचार्य' निर्माण झाले आहेत, हे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) मुलीचा प्रवेश करून पडताळणी फॉर्मची पावती देण्यासाठी ४० हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून एका एजंटला अटक केली आहे.

ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली गंगाराम जगताप (वय ३७, रा. नंदनवन कॉलनी, चिंचवडे नगर, चिंचवड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत एका मुलीच्या वडिलांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. तक्रारदारांनी आपल्या मुलीच्या आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी १६ मार्च २०२६ रोजी ऑनलाइन अर्ज भरला होता. या अर्जाची पडताळणी करण्यासाठी ते २७ एप्रिल २०२६ रोजी आकुर्डी येथील फकीरभाई पानसरे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका उर्दू प्राथमिक शाळेत गेले होते. तेथे त्यांना अर्ज फेटाळल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी त्यांची भेट माऊली जगताप याच्याशी झाली. त्याने तक्रारदारांच्या मुलीचा प्रवेश करून पडताळणी अर्जाची पावती देण्यासाठी ४० हजार रुपये द्यावे लागतील, अशी लाचेची मागणी केली.

याबाबतची तक्रार २९ एप्रिल रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाली. त्याची पडताळणी ३० एप्रिल रोजी करण्यात आली. त्यामध्ये माऊली जगताप याने मुलीच्या ॲडमिशनसाठी ४० हजार रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर फकीरभाई पानसरे उर्दू शाळेत सापळा रचण्यात आला. तक्रारदारांकडून ४० हजार रुपये स्वीकारताना माऊली जगताप याला रंगेहात पकडण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक अजित पाटील, अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविनाश घरबुडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. पोलीस निरीक्षक आसावरी शेडगे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

---

**प्रगणकांना माहिती देऊन सहकार्य करण्याचे मुख्याधिकारी रोकडे यांचे आवाहन**

# पंढरपूरमध्ये डिजिटल जनगणनेला प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार पंढरपूर शहरात १ मे पासून डिजिटल जनगणना मोहिमेस प्रारंभ झाला आहे. नागरिकांनी https://se.census gov.in या संकेतस्थळावर जाऊन ३४ प्रश्नांची माहिती भरावयाची आहे. नोंदणी पूर्ण झालेनंतर मिळणारा युनिक कोड पुढील टप्प्यात प्रगणकाला देणे आवश्यक आहे. प्रगणकांना आपली वैयक्तिक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

सन २०२७ रोजी होणारी सदरील जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे . प्रथमच अशा स्वरूपात ही प्रक्रिया राबविली जात आहे. जनगणनेचा पहिला टप्पा १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत होणार आहे. त्या दरम्यान नागरिकांना स्वयं नोंदणीची (स्वगणना) सुविधा देण्यात आली आहे. नागरिकांनी संकेतस्थळावर जाऊन ३४ प्रश्नांची माहिती भरावयाची आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर मिळणारा युनिक कोड (SE ID) पुढील टप्प्यात प्रगणकाला देणे आवश्यक आहे.

आमदार समाधान अवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक , नगराध्यक्ष प्रणिता भालके तसेच सर्व समितीचे सभापती व नगरसेवक तसेच प्रतिष्ठित नागरिक यांची प्रशासनाने स्वगणना केलेली आहे.

दुसऱ्या टप्प्यात दि. १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील. स्वयं नोंदणी केलेल्या नागरिकांना केवळ युनिक कोड देऊन प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

वैयक्तिक माहिती केवळ सांख्यिकी हेतूसाठी या जनगणनेत नागरिकांची वैयक्तिक माहिती, कुटुंब रचना, घराचा प्रकार, सदस्यांची संख्या तसेच घरातील उपलब्ध सुविधा याचा तपशील गोळा करण्यात येणार आहे. सदरची माहिती केवळ सांख्यिकी हेतूसाठी वापरली जाणार असून गोपनीयतेची पूर्ण हमी देण्यात आली आहे.


दरम्यान, सध्या पर्यवेक्षक व प्रगणक यांचे प्रशिक्षण सुरू आहे. सदर जनगणनेचे प्रत्यक्ष कामकाज करण्याकरिता पंढरपूर शहरामध्ये २८ पर्यवेक्षक व १६५ प्रगणकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. भारतात जनगणनेची परंपरा १८७२ पासून सुरू असून यंदाची जनगणना स्वातंत्र्यपूर्व काळापासूनची १६ वी व स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना ठरणार आहे.

पंढरपूर शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, जनगणनेच्या कामकाजाकरिता नियुक्त प्रगणक घरी आल्यानंतर त्यांना वैयक्तिक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी यांनी केले आहे.

---

# काळेवाडी (दिवे) येथे एसटीच्या धडकेने पादचारी ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : काळेवाडी परिसरात रस्ता ओलांडत असताना एसटी बसची जोरदार धडक बसल्याने ८५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला. नामदेव मारुती कुंजीर वय ८५, रा. आंबळे रेल्वे स्टेशन, ता. पुरंदर असे त्यांचे नाव आहे. ही घटना गुरुवारी दि. ३० दुपारी घडली. या प्रकरणी संबंधित एसटी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुंजीर हे दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास काळे लॉन्ससमोर रस्ता ओलांडत होते. त्या वेळी भरधाव एसटी (एमएच १४ एमएच २६४६) ने त्यांना धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. परिसरातील नागरिकांनी त्यांना ग्रामीण रुग्णालय, सासवड येथे हलविले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक तपासात एसटी बसचा चालक सिद्धेश्वर प्रल्हाद घाडगे वय ३५, रा. दळवी विहार सोसायटी, सासवड.याने निष्काळजीपणे वाहन चालवून हा अपघात घडविल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.